# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील मातोश्री सावित्रीबाई फुले मार्केटच्या बांधकामाची चौकशी करण्याबाबत**

**(१) ७७६ (२२-०१-२०१५) डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५०६५९ ला दिनांक ११ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथील नगरपरिषदेच्यावतीने सुरु असलेल्या भाजी मार्केट बांधकामाची चौकशी करुन वस्तुनिष्ठ अहवाल शासनास जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) प्रस्तुत बांधकामाची अद्याप चौकशी न होणे व अहवाल अप्राप्त असण्याचे कारणे काय आहे व सदरील कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अहवालानुसार सदर बांधकामाचे मुळ प्राकलन सन २००४-०५ च्या दरसूची नुसार रुपये १,६९,५२,८६९/- इतके तयार केले होते. सन २००७-०८ च्या दरसूचीनुसार तयार केलेल्या रुपये ३,१७,८४,०००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली. या प्रकरणी अनियमितता झाली नसल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केलेले आहे.

---

**मालेगांव (जि.नाशिक) मनपा क्षेत्राकरिता पोलीस आयुक्तालयाची स्थापना करणेबाबत**

**(२) ५२८९ (१०-०४-२०१५) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहराचा वाढता विस्तार, प्रचंड लोकसंख्या वाढ, संवेदनशिलता तसेच महानगरपालिका स्थापन होवून चौदा वर्षाचा झालेला कालावधी विचारात घेता मालेगांव महानगरपालिका क्षेत्राकरिता पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव महानगरपालिका क्षेत्राकरिता पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, शहरांतर्गत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून तसेच गतकाळातील घडलेल्या गंभीर घटनांचे पार्श्वभुमीवर मालेगांव येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१), (२) व (३) मालेगांव (जि.नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत प्रस्ताव शासनास फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांना कळविण्यात आले आहे. तथापि पोलीस महासंचालकांकडून अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

---

**खाजगीकरणातून शासकीय निवासस्थाने बांधून देणा-या विकासकांना ज्यादा चटईक्षेत्र देण्याबाबत**

**(३) १३६६१ (२२-१२-२०१५). अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वसाहती उभारण्यासाठी स्वतंत्रपणे विकास नियंत्रण नियमावली जारी करणाऱ्या शासनाने खाजगीकरणातून शासकीय निवासस्थाने बांधून देणा-या विकासकांना प्रोत्साहनात्मक ज्यादा चटईक्षेत्र देण्याचे ठरविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) सदर जागा क्षेत्रफळ देण्याचा लाभ कोणकोणत्या विकासकांनी घेतला आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) शासनाने बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये शासन, शासनाची प्राधिकरणे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या कर्मचारी निवासस्थानासाठी दिनांक २/९/२०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये फेरबदल मंजूर केलेले आहेत. त्यानुसार अशा कर्मचारी निवासस्थानासाठी ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असून १८.०० मी. व त्यावरील रुंद रस्त्यास सन्मुख असलेल्या ४००० चौ.मी. व त्यावरील भूखंडासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे खाजगी जमीन मालकांनी

अशा कर्मचारी निवासस्थानासाठी त्यांचा भूखंड उपलब्ध करुन दिल्यास वरीलप्रमाणे चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध राहणार आहे. खाजगी जमीन मालकांस त्याचा भूखंड मुंबई बेट शहरामध्ये असल्यास ४०% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक व मुंबई उपनगर क्षेत्रामध्ये असल्यास ८०% प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध राहणार आहे.
(२) व (३) यासंदर्भातील प्रकल्पांना मंजूरी देणेचे अधिकार विनियमातील तरतूदीनुसार महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली गठीत असलेल्या समितीस आहेत. याकरिता शासनाचे मान्यतेची आवश्यकता नाही. सदर निर्णयाची अंमलबजावणी सुरुवात होत आहे.

---

**ऑटोरिक्षा आणि टॅक्सीसाठी हकीम समिती रद्द करून नविन समिती नेमण्याबाबत**

**(४) १५०८६ (२७-०४-२०१६) श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७६६७ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑटोरिक्षा आणि टॅक्सीसाठी हकीम समिती रद्द करून शासनाने नविन समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे व नव्या समितीचे कार्यक्षेत्र काय आहे,

(३) असल्यास, ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या मागण्या काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१४-०३-२०१७) :** (१) व (२) राज्यातील ऑटोरिक्षा आणि टॅक्सीचे भाडेदर सूत्र निश्चित करण्याकरिता सन २०१२ मध्ये हकीम समिती नेमली होती हकीम समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार मागील ३ वर्षामध्ये ऑटोरिक्षा आणि टॅक्सी यांचे निश्चित करण्यात आलेले भाडेदर आणि प्रत्यक्षातील भाववाढ यांचा तुलनात्मक अभ्यास करुन हकीम समितीच्या अहवालातील शिफारशीवर पुनर्विचार करण्याकरिता दिनांक १०/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये श्री.बी.सी. खटुआ यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन पध्दतीने घेण्याबाबत**

**(५) १५२१० (२८-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्यार्थीवर्गासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असून त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईनव्दारे किती अर्ज प्राप्त झाले आहेत, उपरोक्त ऑनलाईन प्रणालीमध्ये विद्यालय व विद्यार्थी यांना अनेक अडचणी येत असल्याने ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची मुदत वारंवार वाढविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :** (१) होय.
(२) सन २०१५-२०१६ वर्षाकरीता एकूण १६,७१,७४० अर्ज प्राप्त झालेले आहेत. विद्यार्थ्यांनी मुदतीत अर्ज न भरल्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे.
(३) ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**महाविद्यालयातील शिष्यवृत्ती मिळणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याबाबत**
**(६) १९२५९ (२७-०४-२०१६) श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शैक्षणिक संस्थाना त्यांच्याकडे अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती, एस बी सी विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाने दिले असणे, त्यानुसार दिनांक १५ जानेवारी, २०१६ पर्यंत ११ हजार ७१२ महाविद्यालयांनी केलेल्या नोंदणीत चार प्रवर्गातील १४ लाख १२ हजार ४६४ विद्यार्थी असल्याचे नोंदविले असणे, मागील वर्षी (२०१४ -२०१५) १२ हजार ८५ महाविद्यालयांनी वरील चार प्रवर्गातील १६ लाख ७७ हजार ६१० विद्यार्थ्यांची नोंद केलेली असणे, परंतु या वर्षी ही संख्या कमी होऊन १४ लाख १२ हजार ४६४ असून २ लाख ६५ हजार १४६ ने ती कमी झालेली असणे. या प्रवर्गातील फक्त एकच विद्यार्थी असलेली एकूण ४७५ महाविद्यालये असल्यामुळे सदर शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-०३-२०१७) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी सावकारांवर दाखल केलेल्या गुन्ह्यांबाबत**
**(७) १९४०६ (१९-०८-२०१६) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जाच्या वसुलीसाठी बांधकाम व्यावसायिक श्री.अमोल पवार व पत्नी श्रीमती रोहिणी पवार यांच्यासह दोन लहान मुलांना ठार मारण्याची धमकी देऊन दहशत माजविणा-या महिलेसह बारा खाजगी सावकारांचा अटकपूर्व जामीन फेटाळण्यात आल्याची घटना माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सावकारांविरोधात किती गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तसेच कोणत्या कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल केले वा करण्यात येत आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

तथापि तद्नंतर दिनांक २०/०६/२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयाने दहशत माजविणाऱ्या महिलेसह बारा आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे.

(२) संपूर्ण महाराष्ट्र राज्यात खाजगी सावकारांविरोधात १०९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. हे सर्व गुन्हे महाराष्ट्र सावकारी अधिनियमाच्या विविध कलमान्वये गुन्हे दाखल केलेले आहेत.

(३) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन १४ आरोपींविरुध्द जुना राजवाडा पोलीस स्टेशन, कोल्हापूर येथे गु.र.नं. ७७/२०१६ भा.दं.वि. कलम ३८५, ३८६, ५०६, ५०४, ३४ सह महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम २३, ४२, ३९, ४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या "आपले सरकार" वेब पोर्टल मध्ये सुसूत्रता आणण्याबाबत

**(८) १९५४७ (१९-०८-२०१६) श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरिकांच्या तक्रारी मा. मुख्यमंत्री यांचेपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने सुरु करण्यात आलेली "आपले सरकार" वेब पोर्टलवर "केवळ तुमच्या तक्रारीची नोंद घेतली" व "आपली तक्रार क्लोज" एवढेच उत्तर मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोर्टलवर तक्रारीची केवळ नोंदणी होते मात्र तसा संदेश संबंधितांना मिळतो, नोंदणी सोबतच ही तक्रार क्लोज (बंद) केल्याचा संदेश येतो मात्र काय कार्यवाही झाली, तक्रार कोणाकडे, चौकशी वा कार्यवाहीसाठी पाठवली गेली याचा कुठेही बोध होत नसून एखादया नागरिकांने आपल्या तक्रारीचे काय झाले आहे हे विचारण्यासाठी पोर्टलवर वारंवार भेट दिली तरी तुमची तक्रार नोंदवली गेली एवढेच उत्तर मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पोर्टलची तपासणी करून यात सुसूत्रता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०१७) :** (१) नाही.

वस्तुस्थितीवर आधारित नाही.

(२) आपले सरकार या पोर्टलवर नागरिकांना त्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्याबाबतचा केवळ संदेश त्यांच्या ईमेल आयडी तसेच मोबाईल फोनवर पाठविला जातो. मात्र अंतिम उत्तर पाहण्यासाठी तक्रारदाराने वेब पोर्टलवर लॉगीन करुन ते पाहणे आवश्यक असते. कारण अनेकदा उत्तरामध्ये काही दस्तऐवज अंतर्भूत असतात. अर्जदारास तक्रारीची सद्य:स्थिती व सविस्तर उत्तर पोर्टलवर "तक्रारीचा मागोवा" या शीर्षाखाली उपलब्ध असून तक्रार दाखल

झाल्यानंतर ती नोडल अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष कार्यवाहीसाठी संबंधित अधिकारी/क्षेत्रिय अधिकारी यांना पाठविली जात नाही तोपर्यंत तिची स्थिती “सादर” अशी असते. त्यानंतर तक्रारीवर होत असलेल्या कार्यवाहीनुसार तक्रारीची सद्य:स्थिती “सादर”, “कार्यवाही सुरु”, “निराकरण” व नागरिकांनी कार्यवाहीवरील स्वत:चे अभिप्राय नोंदविल्यावर तक्रारीची स्थिती “बंद” याप्रमाणे विविध टप्प्यानुसार दिसून येते.

(३) सदर वेबपोर्टल सुरु झाल्यापासून नागरिकांकडून प्राप्त सुचनानुसार तसेच आवश्यकतेनूसार पोर्टलमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. भविष्यातही आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) येथील श्री.साईबाबा जन्मभूमी**
**विकासासाठीचा विशेष आराखडा मंजूर करण्याबाबत**

**(९) १९६०३ (१९-०८-२०१६) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ११७७० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील श्री साईबाबा यांच्या जन्मभूमीच्या विकासासाठीचा विशेष आराखडा मंजूर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून अहवाल मागविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साईबाबांच्या जन्मभूमी विकासाबाबत बिहारचे राज्यपाल महोदयांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सूचना पत्र पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी विशेष आराखडा मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालयाकडे सादर केला आहे काय, तद्नुसार सदरील आराखडा मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१७) :** (१) जिल्हाधिकारी, परभणी यांनी श्री.साईबाबा यांच्या जन्मभूमीचा आराखडा सादर करण्याबाबत मुख्यधिकारी, पाथरी नगरपरिषद यांना सूचित केले आहे.

(२) होय.

(३) व (४) नगरपरिषद, पाथरी यांच्यामार्फत विकास आराखडा तयार करण्यासाठी दिनांक २६/१०/२०१५ रोजी सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली आहे. त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक ०६/०६/२०१६ रोजी प्रकल्प सल्लागार यांना कामाचे आदेश दिलेले आहेत. सदर प्रकल्प सल्लागार यांच्यामार्फत विकास आराखडा बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

---

**नाशिक पोलीस आयुक्तालयांतर्गत प्रस्तावित नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी मिळण्याबाबत**

**(१०) १९७०५ (२३-०८-२०१६) डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३२३ ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगर परिसरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याच्या निर्णयांतर्गत पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर निर्माण करावयाची उर्वरित तीन पोलीस ठाणे पद निर्मितीच्या तिसऱ्या ते पाचव्या टप्प्यात निर्माण करण्याचे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विचाराधीन असलेल्या बाबींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, महानगर परिसरातील चेन स्नॅचिंग, खुन, चोऱ्या, टोळी युध्द अशा प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने जनतेकडून केली जाणारी मागणी आणि नवीन पोलीस ठाणे निर्मितीची असलेली आवश्यकता पाहता उक्त पोलीस ठाणे केव्हापर्यंत स्थापन होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवर म्हसरुळ व मुंबई नाका पोलीस ठाणे व विविध संवर्गातील ४४२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्य पोलीस दलामधील पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यास मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे. तथापि तिसऱ्या ते पाचव्या टप्प्यातील पदनिर्मितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी येथील पोलीस निरीक्षकास निलंबित करण्याबाबत**

**(११) १९७१० (२३-०८-२०१६) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांची आर्थिक अडवणूक करणाऱ्या तसेच कारवाई करण्याचे अधिकार नसतांनाही जाणीवपुर्वक त्रास देणाऱ्या परभणी येथील पोलीस निरीक्षक श्री.घोरबांड यांच्या कारभाराची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील तक्रारीप्रमाणे सर्व मुद्यांची सविस्तर चौकशी करून दोषी पोलीस निरीक्षकास निलंबित करण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :** (१) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१८/०४/२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक व विभागीय पोलीस महानिरीक्षक, नांदेड यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.

(२) सदर प्रकरणाची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, परभणी यांनी केली असून चौकशीत पोलीस निरीक्षक, श्री.अशोक घोरबांड यांनी केलेली कार्यवाही नियमानुसार केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारची नियमबाह्य कार्यवाही केली नसल्याने त्यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

## मुंबईतील पवई तलावाचे प्रदुषण रोखण्याबाबत

**(१२) १९७८३ (२३-०८-२०१६) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई तलावात दुषित पाणी सोडल्यामुळे तलावाचे रुपांतर गटारामध्ये झाले असून तलावातील वाढत्या प्रदुषणामुळे त्यातील जलचर देखील हळूहळू नष्ट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००६ मध्ये तलावाच्या जवळील परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी महापालिकेच्यावतीने खर्च करण्यात आलेले रुपये १०० कोटी वाया गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पवई तलावाच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २००६ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तलावाच्या जवळील परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले असून, त्यासाठी रुपये ३३.९९ कोटी इतका खर्च झाला आहे.

तथापि, खर्च करण्यात आलेली रक्कम वाया गेली हे खरे नाही.

(३) व (४) पवई तलावाच्या संवर्धनासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- पवई तलावाचे व त्यावर असणाऱ्या संयंत्राचे परिरक्षण व प्रचालन केले जाते.
- पवई तलावाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कॉम्प्रेसर व हवेचे बुडबुडे सोडणारे एरिटर्स इत्यादी यंत्रे बसविण्यात आली आहेत.
- तलाव स्वच्छ करण्यासाठी जलपर्ण वनस्पती काढण्याची काम हाती घेण्यात आली आहे.

- पवई तलाव व त्याच्या काठावरील उर्वरित भागाचा विकास, सौंदर्यीकरण व तलावात होणाऱ्या सांडपाण्याचा विसर्ग थांबविण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करुन संपूर्ण तलावाचे पुन:रुज्जीवन इत्यादी विषयांमधील तज्ञ वास्तुविशारद/सल्लागार नेमून आराखडा तयार करण्याचे काम करण्यात येत आहे.

---

**परभणी शहर पाणीपुरवठा योजनेतील गैरप्रकारांबाबत**

**(१३) १९८७५ (२३-०८-२०१६) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील वाढीव पाणीपुरवठा योजनेत अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करुन केलेल्या गैरप्रकारांची व नियमभंगांची सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा योजनेतील गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कंत्राटदार यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच दोषींवर कोणती जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे,

(४) तसेच, परभणी शहरवासीयांना पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत परभणी शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेस्तरावर चौकशी करण्याबाबतच्या सूचना जून, २०१६ मध्ये देण्यात आल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत परभणी शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेस्तरावर चौकशी करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. सदर प्रकरणी चौकशी पूर्ण करुन अहवाल तात्काळ सादर करणेबाबत निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आले आहेत.

---

**सोलापूर शहरात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये बांधून देण्याबाबत**

**(१४) २०३५१ (२४-०८-२०१६) श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील शौचालय योजनेकरिता केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेला रुपये २ कोटी मिळाले असून त्यावर कोणतीही कार्यवाही न केल्याने सदर रक्कम दीड वर्षे विना वापर अखर्चित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत "हगणदारी मुक्त शहर" महानगरपालिकेने राबविलेल्या विशेष मोहिमेत विविध ठिकाणी ३ हजार ११७ जण उघडयावर प्रात:विधी करताना निदर्शनास आल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी सर्व विभागीय अधिकाऱ्यांना लेखी पत्र पाठवून शौचालयाकरिता जागेची माहिती दोन दिवसात नगर अभियंता कार्यालयाला कळवावी असे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचे आदेशाचे व हगणदारी मुक्त धोरणाचे पालन न करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व जेथे गरज असेल तेथे वैयक्तिक व सार्वजनिक शौचालये बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेस वैयक्तिक शौचालय बांधकामाकरीता रुपये ११.३४ कोटी वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी रुपये ९.८४ कोटी एवढा निधी वैयक्तिक शौचालय बांधकामाकरीता पात्र लाभार्थ्यांना वाटप करण्यात आला आहे. तसेच, सामुदायिक शौचालय बांधकामाकरीता रुपये १.१५ कोटी अनुदान शासनामार्फत सोलापूर महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहे. सदर निधी सामूदायिक शौचालय बांधकाम करण्याकामी दिनांक १४/९/२०१६ रोजी कार्यारंभ आदेश (work order) देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने शहरातील शौचालयाची संख्या कमी असलेल्या ठिकाणी ११० सिट शौचालयांचे बांधकाम सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या गुड मॉर्निंग पथकास ९३ ठिकाणी ३,११७ नागरीक उघड्यावर प्रात:विधी करताना आढळले होते. परंतु, सद्य:स्थितीत त्यांची संख्या ६१७ आहे.

(३) होय, हे खरे आहे.

आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी शौचालयाकरीता जागा व सिटीची संख्या याबाबतची माहिती दि.२९/४/२०१६ रोजी विभागीय कार्यालयाकडून मागविली होती.

(४) व (५) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत प्राप्त निधीतून दिनांक १३/२/२०१७ पर्यंत १०,०५४ एवढ्या वेयक्तिक शौचालयाचे बांधकामपूर्ण करण्यात आले आहेत. तसेच शौचालयाची संख्या कमी असणाऱ्या ठिकाणी ११० सीट सामुदायिक शौचालयाचे बांधकाम सुरु आहे.

---

**अहमदनगर जिल्हयात नवीन पोलीस ठाणे कार्यान्वित करण्याबाबत**

**(१५) २०५१६ (२३-०८-२०१६) डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात नवीन पाच पोलीस ठाण्यांना प्रशासकीय मंजूरी मिळल्याची घोषणा मा.गृह राज्यमंत्री यांनी केली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जिल्हयाचा भौगोलिकदृष्टया असलेला विस्तार तसेच वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने उपरोक्त मंजूरी प्राप्त झालेली पोलीस ठाणे कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य पोलीस दलातील पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गृह विभाग शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांच्या आस्थापनेवरील सोनई पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शनिशिंगणापूर पोलीस ठाणे निर्माण करण्यात मान्यता देण्यात आली आहे. पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांच्या आस्थापनेवर बोधेगाव, देवळाली व मिरज येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यावर वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून माहिती मागविण्यात आली आहे. तसेच, पदनिर्मितीच्या तिसऱ्या ते पाचव्या टप्प्यामध्ये कोतवाली पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन कडेगांव पोलीस ठाणे निर्माण करण्याची बाब पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाच्या विचाराधीन असून त्यांनी पारनेर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन टाकळी ढोकेश्वर पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांचे अभिप्राय मागविले आहेत.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने इमारतींवर मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्याचा ठराव मंजूर केल्याबाबत

**(१६) २०६३७ (२४-०८-२०१६) श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील राज्य शासनाच्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या ११६० इमारतींवर एक रुपया प्रती चौरस मीटर दराने मोबाईल टॉवर व अन्य संबंधित उपकरणे उभारण्यास दूरसंचार कंपन्यांना परवानगी देण्यासंबंधीची योजना महापालिकेने आखलेली असून महापालिकेच्या सुधार समितीने याबाबतचा ठराव मंजूर करून तो स्थायी समितीकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठराव कायदेशीर आहे काय व त्याबाबत शासनाची मंजूरी घेतली आहे काय, तसेच यासंदर्भात माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, खाजगी इमारतींवर मोबाईल टॉवर्स उभारण्यासाठी प्रती वर्षी २४ ते ३० लाख रुपये द्यावे लागतात व बेस्टने रुपये ३.५० लाख शुल्क आकारुन त्यांच्या इमारतींवर टॉवर्स बसविण्यास परवानगी दिलेली असताना महापालिका एक रुपया शुल्क आकारुन मोबाईल टॉवर्स उभारण्यास परवानगी देण्याचे ठरवित आहे या आर्थिक भिन्नतेबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०१७) :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाजगी, राज्य शासन तसेच, महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींवर दूरसंचार स्तंभ, मनोरे, उपकरणे, मायक्रोसेल इत्यादी उभारण्याबाबतचा प्रस्ताव सुधार समिती व स्थायी समिती यांनी अनुक्रमे दिनांक १६/३/२०१६ व २७/४/२०१६ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ९२(क) व ९२(ड) अन्वये मंजूर करुन तो महानगरपालिकेच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आला आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या महासभेमार्फत सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली नाही.

(३) व (४) राज्य शासनाच्या तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारतींवर दूरसंचार स्तंभ, मनोरे, उपकरणे, मायक्रोसेल इत्यादी उभारणी करण्यासाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.

बेस्ट उपक्रमाने इमारतीवर अथवा जमिनीवर मोबाईल टॉवर्स उभारण्यासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारुन परवानगी दिलेली

| अ.क्र. | कंपनीचे नाव | कंत्राटाचा कालावधी | भाड्याने दिलेली ठिकाणे | वार्षिक भाडे (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | रिलायन्स इंन्फ्राटेल लि. | ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१८ | ५३ | ४,००,३९१/- प्रति जागा प्रतिवर्ष |
| २. | इंडस टॉवर्स लि. | ०१/०६/२०१३ ते ३१/०५/२०१८ | ६ | २,२०,०००/- प्रति जागा प्रतिवर्ष १०% वाढ |
| ३. (अ) | रिलायन्स जिओ इंफोकॉम लि. | २७/०१/२०१५ ते २६/०१/२०२० | १४ | ४,००,०००/- प्रति जागा प्रतिवर्ष १०% वाढ |
| ३. (ब) | रिलायन्स इंफोकॉम लि. | १०/११/२०१५ ते २६/०१/२०२० | १० | ४,००,०००/- प्रति जागा प्रतिवर्ष अधिक प्रतिवर्ष १०% वाढ |

---

**सेलु (जि.परभणी) नगरपालिका कार्यक्षेत्रात बांधण्यात आलेल्या शौचालयाचे अनुदान लाभार्थ्यांना मिळणेबाबत**

**(१७) २०६६३ (२३-०८-२०१६) श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलु (जि.परभणी) नगरपालिकेच्या गैरकारभारामुळे स्वच्छ भारत अभियानांतर्गत अनेकांनी शौचालयाचे बांधकाम स्वत:च्या खर्चाने पुर्ण केले असले तरी नगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान लाभार्थ्यांना मिळाले नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) स्वच्छ भारत अभियानांतर्गत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामासाठी पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर केल्यानंतर पहिल्या हप्त्याच्या निधी वितरीत करण्यात येतो. शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, अर्जदार व शौचालयाचे

बांधकाम यांचा भौगोलिक टॅग केलेला स्वंय साक्षांकित फोटो स्वच्छ भारत अभियानाच्या एम.आय.एस. वर अपलोड केल्यानंतर दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येतो. सेलू नगरपरिषदेमार्फत वैयक्तिक घरगुती शौचालय बांधकामाकरीता पात्र लाभार्थ्यांपैकी १७१० लाभार्थ्यांना रुपये ६०००/- प्रमाणे पहिला हप्ता व ८३ लाभार्थ्यांना रु.६०००/- प्रमाणे दुसरा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. तसेच शौचालयाचे बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांस सेलू नगरपरिषदेमार्फत दुसऱ्या हप्त्याचा निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात वाघांच्या कातडयाची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(१८) २१४६२ (२३-०८-२०१६) प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील आष्टी मार्गावर तेलंगनातील चार आंतरराज्य तस्करांना वाघांची शिकार करुन त्यांचे कातडयाची तस्करी करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केल्याची घटना दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०१७) :** (१) व (२) दिनांक ०३/०५/२०१६ रोजी ४ व्यक्ती अवैधरित्या वाघाचे चामडे ताब्यात बाळगून अंतर राज्यीय वाहतूक करीत असतांना आढळून आले असता स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी त्याच्याकडून एक वाघाचे चामडे व मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास वन परिक्षेत्र अधिकारी, धाबा यांच्याकडे आरोपीसहीत हस्तांतरीत करण्यात आला असून संबंधितांवर पीओआर क्रमांक ०८/२०१३ कलम ९, ३९, ४४ (१) (अ), ४८ (अ), ४९ (ब), ५०, ५१ वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ अन्वये गुन्हा नोंद असून नमूद प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महापालिका, नगरपालिका व नगरपंचायतीत कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याबाबत**
**(१९) २२०५५ (२४-०८-२०१६) आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीमधून दैनंदिन २६८२०.२९ मेट्रीक टन कचऱ्याची निर्मिती होते त्यापैकी ६०३६.५०. मेट्रीक टन कचऱ्यावरच प्रक्रिया होत असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दैनंदिन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक १३/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या सन २०१५-१६ च्या वार्षिक अहवालानुसार राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती आणि कटक मंडळ कार्यक्षेत्रात दररोज २१,८६७ मेट्रीक टन कचऱ्याची निर्मिती होते. त्यापैकी ६६९१ मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते.

(२) स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्यातील प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने शहराची गरज ओळखून तसेच नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०१६ व केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेले नियम विचारात घेवून घनकचरा व्यवस्थापनासाठी शहराचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे अपेक्षित आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास उच्च स्तरीय समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासनामार्फत अनुज्ञेय निधी वितरीत करण्यात येतो. त्याप्रमाणे राज्यातील ८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत एकूण रुपये ७०.७१६६ कोटी एवढा पहिला हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला आहे. राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे घनकचरा व्यवस्थापन विषयक प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावरुन कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई लघुवाद न्यायालयाच्या इमारतीतील उद्वाहन दुरुस्तीबाबत

**(२०) २२४६५ (१९-०८-२०१६) श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई लघुवाद न्यायालयाच्या इमारतीतील तीन उद्वाहन मागिल सहा महिन्यांपासून दुरुस्तीअभावी बंद असल्याने सदर न्यायालयात कामकाजासाठी येणाऱ्या वकील आणि पक्षकार यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर उद्वाहन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०३-२०१७) :** (१) हे अंशतः खरे आहे.

लघुवाद न्यायालयातील ८ उद्वाहनांपैकी ६ उद्वाहने आजपावेतो सुरळीत कार्यरत असून विद्यूत निरीक्षक (उद्वाहन) यांनी उद्वाहन क्रमांक ७ व ८ च्या शाफ्टच्या स्थापत्य दुरुस्तीची कामे केल्याशिवाय सदर उद्वाहने चालविणे सुरक्षित नाही असे त्यांचे अहवालात नमूद केले आहे. स्थापत्य दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असल्याने उद्वाहन क्रमांक ७ व ८ बंद आहेत.

(२) व (३) शाफ्टच्या स्थापत्य दुरुस्तीच्या कामासाठी सदर उद्वाहने बंद आहेत. उद्वाहने दुरुस्ती स्थापत्य दुरुस्तीच्या एकत्रित प्रस्तावास मंजूरीनंतर निविदा निश्चिती करुन कामे हाती घेण्यात येतील.

---

**बी.टी.कपाशीच्या सुधारीत वाण संशोधनाबाबत**

**(२१) २३४८४ (३०-१२-२०१६) श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रासायनिक किडनाशक प्रतिकार शक्ती विकसित होण्याच्या किडी मधील नैसर्गिक गुणधर्मामुळे बी.टी.कपाशीमध्ये बोंड अळी व इतर रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे सदर बियानातील डेल्टा-येण्डो टोकझिन यामुळे किडीमध्ये प्रतिकार क्षमता वाढून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कृषी विद्यापीठात बी.टी.कपाशीच्या सुधारीत वाण निर्मितीसाठी संशोधन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अप्पर मुख्य सचिव, कृषी विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कपाशीच्या नवीन सुधारित वाण संशोधनाबाबत तसेच बी.टी.कपाशीवरील बोंड अळी व इतर रोगाच्या प्रतिकाराबाबत कृषी संशोधन केंद्र आणि विद्यापीठात अद्यावत संशोधन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०८-०३-२०१७) :** (१) होय.

बी.टी.कापूस पिकातील अळीकरीता विषारी असलेल्या डेल्टा एन्डो टॉक्झीन या प्रथिनामुळे अळ्यांचा प्रादुर्भाव बी.टी.कापसावर ९० ते १०० दिवसांपर्यंत होत नाही. त्यामुळे बी.टी.कापूस पीक बोंडअळ्यांसाठी प्रतिकारक आहे. तथापि, चालू हंगामामध्ये काही भागामध्ये कापूस पिकावर शेंदरी बोंडअळी या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. अळ्यांच्या रासायनिक कीडनाशकांच्याविरुध्द प्रतिकारशक्ती विकसित करण्याच्या गुणधर्मामुळे शेंदरी बोंडअळीमध्ये प्रतिकारक्षमता तयार झाली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मराठवाड्यातील काही भागांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतावर अळींचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

(२) होय.

(३) राष्ट्रीय स्तरावर केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या मार्फत कपाशीच्या विविध सरळ वाणामध्ये क्राय - १ एसी (बीजी १) हा जनुक प्रत्यारोपित केला असून, खरीप २०१६ हंगामामध्ये अशा २१ सरळ वाणांचे प्रक्षत्र चाचणी प्रयोग देशातील १२ ठिकाणी घेण्यात आलेले आहेत. या अंतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी विद्यापीठाने विकसित केलेला आर.ए.सी. - २०२२ हा सरळ वाण (बीजी-१) राष्ट्रीय पातळीवर चाचणी प्रयोगामध्ये समाविष्ट केलेला आहे. तसेच महाबिज, अकोला आणि महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्यामध्ये सामंजस्य करारानुसार फुले श्रेतांबरी या कपाशीच्या नवीन संकरीत वाणामध्ये बीजे-२ जनुक अंतर्भूत करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी जेके ॲग्रोजेनेटिक्स लिमिटेड, हैद्राबाद या संस्थेशी केलेल्या सामंजस्य करारानुसार पीडीकेव्ही जेकेएल-११६ हे बीजी-२ हे बीटी कापसाचे वाण तयार करण्यात आलेले असून हे वाण परिक्षणासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर

प्रात्यक्षित प्रयोगामार्फत देण्यात आलेले आहे. देशी सरळ वाण (रजत, एकेएच ०८१ आणि एकेएच ८८२८ यामध्ये बीटी जनुक टाकून बीजी १ (संकरीत) वाण तयार करण्यात येत आहे.

तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीद्वारे विकसित एनएचएच ४४ या लोकप्रिय संकरीत वाणाचे बीजी २ स्वरुपामध्ये रुपांतरण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला (महाबीज) सोबत सामंजस्य करारान्वये महाबीज, अकोला येथे करण्यात आले आहे. या संकरीत वाणाच्या बी.टी.बीजी-२ संस्करणाचे काम पूर्ण झाले असून त्याच्यादेखील प्रक्षेत्र चाचण्या कापूस संशोधन केंद्र, नांदेड येथे सन २०१६-१७ हंगामामध्ये चालू आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत नांदेड येथे कपाशीचे बी.टी.(बीजी-१) स्वरुपातील सरळ तथा संकरीत (बीजी-२) वाण विकसीत करण्याचे काम चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सार्वजनिक बांधकाम विभागातील गैरव्यवहाराबाबत

**(२२) २३५३५ (३०-१२-२०१६) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध इमारतींमधील विद्युत दुरूस्त्यासाठी सन २०१५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागाने एकूण ४९ निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कंत्राटदारांना वर्क ऑर्डर देण्याच्या शेवटच्या टप्प्यात कार्यकारी अभियंता यांनी पत्रक काढून या सर्व ई-निविदा रद्द केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्युत विभागाला ई-प्रणाली पुरवणाऱ्या 'नेक्स्ट टेंडर' या कंपनीने केवळ १८ निविदामध्ये फेरफार झाल्याची कबूली दिली असतानाही सर्वच्या सर्व ३९ निविदा रद्द करण्यात आल्यामुळे मर्जितल्या कंत्राटदारांशिवाय इतर कंत्राटदाराने निविदा भरल्याने प्रक्रिया रद्द केल्याचा आरोप 'इलेक्ट्रिकल कॉंट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' या संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत विभागात ई-निविदा प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. तथापि मर्जीतल्या कंत्राटदारांसाठी निविदा रद्द केली हे खरे नाही.

(३) या प्रकरणी प्राप्त तक्रारीची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषी विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) २४४५५ (३०-१२-२०१६) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राहुरी, अकोला, परभणी व दापोली कृषी विद्यापीठात ४४४१ पदे (३४ टक्के) रिक्त असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे विद्यापीठांमधील शैक्षणिक, संशोधन आणि विस्तार विकासाचे काम रखडलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे, कर्मचाऱ्यांवर कामाचा बोजा वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१०-०३-२०१७) :** (१) होय.

(२) नाही.

(३) नाही.

(४) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९/०५/२०१६ रोजी कृषी विभागाची आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीत कृषि विद्यापीठांमधील रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला. मा.मुख्यमंत्री महोदयांनी कृषि विद्यापीठांतर्गत रिक्त पदांच्या (विशेषत: शिक्षकवर्गीय) ५०% मर्यादेत पदभरतीस सहमती दर्शविली आहे. यानुषंगाने, आवश्यक कार्यवाहीबाबत कृषि विद्यापीठांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे विद्यापीठस्तरावर रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा कृषी विद्यापीठ (जि.परभणी) येथील बांधकामात झाल्याबाबत**

**(२४) २४४८० (३०-१२-२०१६) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा कृषी विद्यापीठ (जि.परभणी) येथील कोट्यवधी रूपयांच्या बांधकाम गैरव्यवहार प्रकरणी महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महासंचालक, पुणे यांनी चौकशी अहवाल शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार दोषी अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार, मजूर संस्था व इतर अधिकाऱ्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१०-०३-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचे महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना निदेश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा आणि**
**सांडपाणी प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(२५) २४५४१ (०४-०१-२०१७) श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत राज्यातील ४४ शहरातील पाणीपुरवठा आणि सांडपाणी प्रकिया कामांच्या रुपये ४५०० कोटीच्या कामांना माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधीपैंकी केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष किती निधी प्राप्त झाला आहे व राज्य शासनाने किती निधी उपलब्ध केला आहे,
(३) असल्यास, उक्त निधीतून कोणत्या प्रकल्पांची कामे सुरु करण्यात आली आहेत व त्यांची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उर्वरित प्रकल्पांची कामे सुरु न करण्याची कारणे काय आहेत व सदर कामे केव्हा सुरु करण्यात येणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षासाठी रु.४४७९ कोटी किंमतीच्या राज्य शासनाच्या आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर आराखड्यामध्ये ४५ पाणीपुरवठा व १३ मलनिस्सारण प्रकल्पांचा समावेश आहे.
(२) सदर मंजूर आराखड्यापोटी केंद्र शासनाकडून रु.४१८ कोठी इतका निधी प्राप्त झाला असून त्याप्रमाणात राज्य शासन हिश्याचा रु.२०९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) व (४) राज्य शासनास मंजूर आराखड्यापैकी १३ पाणीपुरवठा प्रकल्पांची कामे सुरु झालेली आहेत.

१९ पाणीपुरवठा व ३ मलनिस्सारण प्रकल्पांची निविदा प्रक्रिया सुरु असून उर्वरित प्रकल्पाचे डीपीआर तयार करण्याची कार्यवाही अभियान शहरांमार्फत करण्यात येत आहे.

---

## नागपूर येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) च्या खंडपीठावर सदस्यांच्या नियुक्त्या करणेबाबत

**(२६) २४६९६ (०४-०१-२०१७) श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय अधिकारी कर्मचारी यांचेसाठी न्यायाची पहिली पायरी असलेल्या मॅटच्या (महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण) नागपूर खंडपीठाचा कारभार अवघ्या एका न्यायिक सदस्यावर आला असून तेथील दोन सदस्य निवृत्त झाल्यामुळे नियमित कामाची गती मंदावली असून शेकडो प्रकरणात निकालाची प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने नागपूर येथील खंडपीठावर दोन सदस्यांच्या नियुक्त्या करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

नागपूर खंडपीठातील सदस्य (न्यायिक) हे पद दिनांक २६/०१/२०१६ पासून तर सदस्य (प्रशासकीय) हे पद दिनांक ०८/०७/२०१६ पासून रिक्त आहे.

तथापि, वरील पदे रिक्त झाल्यापासून मुंबई व औरंगाबाद खंडपीठावरील मा.सदस्य कार्यालयीन सोयीप्रमाणे नागपूर खंडपीठ येथील प्रकरणे निकाली काढण्यासाठी जातात.

तर तातडीची प्रलंबित प्रकरणे मुंबई खंडपीठ येथे निकाली काढण्यासाठी मागविली जातात. तर आवश्यकतेनुसार नवीन प्रकरणे मुख्य खंडपीठ मुंबई येथे निकाली काढण्यासाठी वर्ग केली जातात.

मात्र, शेकडो प्रकरणात निकालाची प्रतिक्षा असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे म्हणता येणार नाही.

(२) सदस्य (न्यायिक) च्या पदासाठीची शिफारस दिनांक ०८/०३/२०१६ च्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठविण्यात आली आहे.

तर सदस्य (प्रशासकीय) च्या पदासाठीची शिफारस दिनांक २३/११/२०१६ च्या पत्रान्व्ये केंद्र शासनास पाठविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरगाव (मेघे) (जि.वर्धा) येथील महावीर हुपॉन व बायर या कंपनीच्या बनावट किटकनाशकांचे पॅकींग होत असल्याबाबत**

**(२७) २४७१६ (३०-१२-२०१६) श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरगाव (मेघे) (जि.वर्धा) येथील महावीर नगरातील एका घरात घातलेल्या धाडीत हुपॉन व बायर या नामांकित कंपनीच्या बनावट किटकनाशकांचे पॅकींग होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद कृषी अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत सुमारे दोन लाख रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले असून वर्धा पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने गुन्ह्यातील प्रमुख सूत्रधारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-०३-२०१७) :** (१) होय.
(२) होय.
(३) शहर पोलीस स्टेशन वर्धा येथे दिनांक २९/०९/२०१६ रोजी कृषी विभागामार्फत एफ.आय.आर.क्र. २०६८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथे प्राधिकरण प्रशासनाकडून नागरिकांची लूट होत असल्याबाबत**

**(२८) २४७४९ (०४-०१-२०१७) आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेऊनही भूखंडावर ७५ टक्के बांधकाम केले नाही असे कारण देऊन प्राधिकरण प्रशासन नियमबाह्य अतिरिक्त अधिमूल्याच्या नावाखाली नागरिकांची लूट करीत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राधिकरणाच्या उपरोक्त निर्णयाला शासनाची मान्यता नसल्यामुळे अशा प्रकारची वसूली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) व (२) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभा क्र.३०८, दिनांक २८/०१/२०१४ मधील ठरावानुसार सदरचे धोरण मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करणेस प्राधिकरण सभेने मान्यता दिली असून प्राधिकरण क्षेत्रातील वितरीत भूखंडावर बांधकाम परवानगी/पुर्णत्व प्रमाणपत्र प्रकरणी शासन मान्यतेची

वाट न पाहता वापर सुरु करण्याचा ठराव पारित केला आहे. उपरोक्त केलेल्या ठरावानुसार अतिरिक्त अधिमूल्य वसूली बाबतची कार्यवाही चालू करण्यात आली आहे.

उपरोक्त नमूद ठरावानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५९ नुसार प्राधिकरणाच्या भू-वाटप नियमावलीमध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. याबाबत कायदेशीर बाबी तपासून योग्य तो निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवडीसाठी मंजूरी मिळण्याबाबत**

**(२९) २४८८२ (३०-१२-२०१६) श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाने रोजगार हमी योजनेतून सन २०१६-१७ वर्षासाठी १९ हजार ९७५ हेक्टर क्षेत्र फळबाग लागवडीसाठी प्रस्तावित केले असताना शासनाने त्यापैकी केवळ ५१४४ हेक्टरवर फळबाग लागवडीसाठी रोजगार हमी योजनेतून करण्यासाठी चार महिन्यानंतर मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१०-०३-२०१७) :** (१), (२) व (३) होय, रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीसाठी नियोजन (रोहयो) विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सन २०१६-१७ करीता अधिक निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. नियोजन (रोहयो) विभागाकडून दिनांक ३०/०७/२०१६ रोजी सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी रुपये ८ कोटी व विशेष घटक लाभार्थ्यांसाठी रुपये ४ कोटी असा निधी उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले. त्यानुसार आयक्त कृषी कार्यालयाकडून फळबाग लागवडीचा फळपिक / जिल्हानिहाय लक्षांकाचा फेरप्रस्ताव मागविण्यात आला व निधी उपलब्धतेनुसार सदर योजना सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी ३३९४ हेक्टर व विशेष घटक लाभार्थ्यांसाठी १७५० हेक्टर क्षेत्रावर राबविण्यास, शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१६ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

---

**मानसरोवर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण (ता.पनवेल, जि.रायगड)**
**संस्थेतील इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(३०) २५०७१ (०४-०१-२०१७). श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानसरोवर कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.१,२,४,५,१९ ते २६ सेक्टर-३१ कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) या संस्थेतील १ ते १५ इमारतींचे बांधकाम पूर्ण होवून इमारत क्रमांक १ ते १३ ला सन २००३ मध्ये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे, तथापि इमारत

क्रमांक १४ व १५ चे बांधकाम सन २००४ मध्ये पूर्ण होवूनही सिडको, बेलापूर यांनी अद्याप भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारत क्रमांक १४ व १५ यांना तातडीने भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, बेलापूर यांना लेखी निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) व (४) सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.८८१९ नुसार "पायाभूत सेवा शुल्क" नवी मुंबई क्षेत्रामध्ये दिनांक ४/३/२००४ च्या कार्यालयीन आदेशाद्वारे लागू करण्यात आले. विकासकाने सिडकोचे "पायाभूत सेवा शुल्क" भरले नसल्यामुळे इमारत क्र. १४ व १५ ला भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले नाही.

---

## शासनाने सीआरपीसी ॲक्टच्या कलम १५६ (३) आणि कलम १९० मध्ये सुधारणा करण्याचा घेतलेला निर्णय

**(३१) २५१२१ (०४-०१-२०१७) ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीआरपीसी ॲक्टच्या कलम १५६ (३) आणि कलम १९० मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्यामुळे सामान्य नागरीकांना कोणते अधिकार देण्यात आले होते,

(३) असल्यास, या कायद्यात सुधारणा केल्यामुळे नागरिकांना त्यांच्या अधिकारापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या कायद्यात सुधारणा न करण्याची काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१७) :** (१) होय.

(२) ते (४) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १५६ (३) मधील तरतूदीनुसार लोकसेवकाविरुध्द न्यायालयात अनेक तक्रारी दाखल करण्यात येतात. या तक्रारीमध्ये काही तक्रारी ह्या प्रामाणिक व चांगले काम करणाऱ्या लोकसेवकांविरुध्दही असतात. अशा तक्रारींमुळे लोकसेवकांना त्यांची शासकीय कर्तव्य बजावताना अनेक वेळा नाहक त्रास सहन करावा लागतो व कित्येक प्रकरणांत त्यांचे मानसीक खच्चीकरण देखील होत असते.

याबाबी विचारात घेऊन फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१५ पारीत करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या अंमलबजावणीचा प्रारंभ दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ असा नियत केलेला आहे. या सुधारणेमुळे सामान्य नागरीकांना त्यांच्या अधिकारापासून वंचित राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांना ई.बी.सी. ची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत**

**(३२) २५१९७ (३०-१२-२०१६) श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४ कृषि विद्यापीठाअंतर्गत कृषि महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ई.बी.सी.ची सवलत दिली जात असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गतचे विद्यार्थी वगळता इतर कृषि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना सन २०१५ पर्यंतची ई.बी.सी. ची रक्कम दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांना सन २०११ ते २०१६ या कालावधीतील ई.बी.सी.ची रक्कम अद्याप मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मराठवाड्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सन २०११ ते २०१६ या कालावधीतील ई.बी.सी. ची रक्कम देणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-०३-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात होत असलेले गैरव्यवहार रोखण्याबाबत**

**(३३) २५३५६ (३०-१२-२०१६) ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने करण्यात येणारे रस्ते, पूल व इमारतीच्या बांधकाम अथवा दुरुस्तीच्या कामांतील गैरव्यवहार रोखण्याकरीता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-निविदा पध्दतीमध्ये गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासनाकडे बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सार्वजनिक बांधकाम विभागात होत असलेले संभाव्य गैरव्यवहार रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०३-२०१७) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात

**(३४) २५३७१ (०४-०१-२०१७) ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित असल्याने दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजीपासून मोर्चाचे आयोजन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत, यापैकी कोणत्या मागण्या प्रलंबित असून कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०३-२०१७) :** (१) दिनांक २१/९/२०१६ रोजी शासन मान्यता प्राप्त नसलेल्या राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना यांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात मा.मुख्यमंत्री यांचे नागपूर येथील निवासस्थानासमोर उपोषणाला बसण्याचा इशारा दिला होता. सदर उपोषण संबंधितांनी स्थगित केले होते.

(२), (३) व (४) अनुकंपा तत्वावर विनाअट सेवा भरती करणे, सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा व वैद्यकीय कारणास्तव अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास सेवेत समावून घेणे, रिक्त पदे भरणे, राज्य कामगार विमा नवीन महामंडळ रद्द करणे इत्यादी विविध १३ मागण्या राज्य शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी यांनी केल्या आहेत. सदर मागण्यांबाबत मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/१/२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने संबंधित विभाग/कार्यासनांना पुढील कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.

---

### राज्यातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(३५) २५५५८ (३०-१२-२०१६) श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गेली चार वर्षे सातत्याने दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्यासाठी राज्यात ठिबक सिंचन सक्तीचे करणाऱ्यावर भर दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी शासनाची पूर्व मंजूरी घेवून ठिबक सिंचन योजना राबविल्या ते शेतकरी तीन वर्षे अनुदानापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २५ जून, २०१५ च्या अधिसूचनेन्वये १) टेंभु उपसा सिंचन योजना, २) भीमा (उजनी), ३) मुळा, ४) निम्न मानर, ५) हतनूर, ६) उर्ध्व ऊस, ७) कान्होळी नाला (नागपूर) ८) अंबोली सिंधुदुर्ग प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील बारमाही पिकांना जून, २०१८ पर्यंत सूक्ष्म सिंचनासारख्या सिंचन पध्दतीचा अवलंब करण्याचे अनिवार्य केले आहे.

(२) सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील पुर्व संमती दिलेले रुपये १८५.२२ कोटी एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.

(३) प्रलंबित प्रकरणांसाठी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड प्रकल्पाबाबत**

**(३६) २५६६१ (०४-०१-२०१७) श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वडगांवशेरी, खराडी, चंदन नगरसह शहराच्या पूर्व भागासाठी "नवसंजीवनी ठरणाऱ्या भामा आसखेड प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) तसेच, या प्रकल्पाला आतापर्यंत किती खर्च आला आहे व तो किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) भामा-आसखेड प्रकल्पाचक काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

(२) व (३)

- पुणे येथील भामा-आसखेड धरणातून पुणे शहराला पाणीपुरवठा या प्रकल्पासाठी आतापर्यंत एकूण रक्कम रु.१७२ कोटी खर्च झाला आहे.
- सदर योजनेचे काम डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- तथापि, जॅकवेलपासून ६.०० कि.मी. लांबरचे अशुध्द जलवाहिनीचे काम प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे बंद आहे.
- त्याअनुषंगाने भामा आसखेड प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी पुणे शहरास भामा-आसखेड उद्भवावरुन मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पामधून कुरळी येथून Tapping देऊन ५ MLD पाणी (Raw Water) आळंदी नगरपरिषदेस उपलब्ध करुन देणेबाबतच्या सूचना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.
- सदर प्रकल्पास विरोध करणाऱ्या आंदोलकांना ही वस्तुस्थिती कळवून हे आंदोलन मागे घेण्याबाबत व भामा-आसखेड उद्भवावरुन सुरु असलेल्या प्रकल्पाचे काम युध्द पातळीतवर पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करणेबाबत सूचना पुणे महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

---

**सेलू (जि.परभणी) तालुक्यातील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३७) २५७२७ (३०-१२-२०१६) श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी वास्तव्यास असलेल्या इमारती मोडकळीस आल्याने धोकादायक झाल्याबाबत तक्रारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०३-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. (बहुतांश इमारती ५० वर्षापूर्वीच्या असून त्या मोडकळीस आल्या आहेत.)

(२) सदरील प्रकरणी प्रत्यक्षात पाहणी केली असता जवळपास सर्व निवासी इमारती मोडकळीस आल्या असून या ठिकाणी नवीन निवासस्थाने बांधणे आवश्यक असल्याचे आढळून आले.

सदर इमारतींची दुरुस्ती करण्यापेक्षा नवीन इमारती बांधणे योग्य असल्याने नवीन इमारती बांधणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत आहे.

---

**मुंबई येथे सहा हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(३८) २५९१८ (०४-०१-२०१७) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये चोऱ्या व दरोडे वाहतुक नियमांचे उल्लंघन इत्यादी गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सहा हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सीसीटिव्हीसाठी नियंत्रण कक्ष कोठे उभारण्यात येणार आहे, यासाठी किती खर्च येणार आहे व ही यंत्रणा प्रत्यक्षात केव्हा कार्यान्वित होणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) मुंबई शहरामध्ये एकूण ४७१७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

(२) व (३) सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयात स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षातून केले जाते. वाहतुक पोलीस मुख्यालय, वरळी येथे अतिरिक्त नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाचा एकूण खर्च रु.९४९ कोटी एवढा निश्चित करण्यात आला आहे.

---

**सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन अनुदान देण्याबाबत**

**(३९) २६०३५ (३०-१२-२०१६) श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संचासाठी अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील सन २०१३-१४ या वर्षी ठिबक सिंचन संच बसलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान देण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून ठिबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-०३-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) सोलापूर जिल्हयातील सन २०१३-१४ या वर्षातील २३३९४ पात्र लाभार्थ्यांचे रुपये ५६.२१ कोटी एवढ्या रकमेचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १२३३२ लाभार्थ्यांच्या अनुदानाची रक्कम रुपये ३६.६६ कोटी त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनुसार उर्वरित लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयातील सुरक्षा मुदत संपलेल्या ब्रिटिशकालीन**
**पुलांच्या पुनर्निमाण करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(४०) २६३४६ (३०-१२-२०१६) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील सुरक्षा मुदत संपलेल्या ब्रिटिशकालीन पुलांच्या पुननिर्माण करण्याच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार जिल्हयातील किती पुलाचे पुननिर्माण करण्यात येणार आहे व त्याकरिता किती खर्चाची तरतूद करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदर कामास केव्हापर्यंत सुरूवात होणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) अकोला जिल्हयातील चार ब्रिटीशकालीन पूलांपैकी २ पूलांचे काम मंजूर असून त्यापैकी एक पुलाचे काम प्रगतीत आहे. उर्वरित दोन पुलांचे काम मंजूर नसून सदर दोन पुलांचे काम मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील सहकारी संस्थाच्या फेडरेशनला कोणतीही माहिती न देता**
**दुग्ध उत्पादक संघ गुजरात सरकारला दूध विकत असल्याबाबत**

**(४१) २६३५४ (३०-१२-२०१६) श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १५९६५ ला दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ दुग्ध उत्पादक संघ सहकारी संस्थाच्या फेडरेशनला कोणतीही माहिती न देता गुजरात शासनाला दूध विकत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दूध उत्पादक संघावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१५-०२-२०१७) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे स्थापन करण्याबाबत**

**(४२) २६४५६ (१६-१२-२०१६) श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशिम येथे स्थापन करण्याची जिल्हावासियांची अनेक काळापासून मागणी असून संघर्ष समितीसह अनेक संघटनांनी आंदोलनेही केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी वाशिम पासून १६ कि.मी. अंतरावर असलेल्या अनसिंग रोडवरील बाभुळगाव येथे शासनाने सुमारे १०८ एकर जमीन ताब्यात घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेवून वाशिम येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून जमीन मंजूर झाली नाही व जमीन ताब्यात घेण्यात आलेली नाही.

(३) उपकेंद्रच्या निर्मितीसाठी समान धोरण निश्चित करण्यासाठी डॉ.योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २८/०४/२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने त्यांच्या अहवाल शासनास दिनांक २३/०२/२०१६ रोजी सादर केला असून शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सौर कृषीपंपाचे वाटप करण्याबाबत**

**(४३) २६५९९ (०४-०१-२०१७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात विद्युतीकरण न झालेली गावे तसेच वीज जोडणीची रक्कम भरुनही महावितरणकडे प्रलंबित असलेल्या दुर्गम भागातील शेतक-यांसाठी शासनाने सौर कृषीपंप देण्याची योजना जाहीर केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत पश्चिम महाराष्ट्राचा समावेश नसल्याने येथील अवर्षण प्रवण व दुर्गम भागातील हजारो पात्र शेतकरी या लाभापासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सौर कृषीपंप योजना ही आत्महत्याग्रस्त व दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी पथदर्शी स्वरुपात राबविली जात आहे.

(३) पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी बिनव्याजी कर्ज**
**व कमी दरात वीज उपलब्ध करण्याबाबत**

**(४४) २६६०० (०४-०१-२०१७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वस्त्रोद्योगात आलेली जागतिक मंदी, कापूस उत्पादनातील घट, कापसाची कमी झालेली मागणी, शासनाचे उदासीन धोरण आणि अन्य राज्यांच्या तुलनेत जास्त असणारे वीजदर यामुळे राज्यातील ६३ सहकारी सुतगिरण्या तोट्यात असल्याचे माहे आक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी प्रति रुपये तीन हजार बिनव्याजी कर्ज तसेच कमी दरातील वीज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०३-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक ३१/३/२०१६ अखेर राज्यात उत्पादनाखाली असलेल्या ६५ सुतगिरण्यांपैकी ५८ सुतगिरण्या तोट्यात आहेत. त्या सूतगिरण्या कोणत्या कारणामुळे तोट्यात आहेत याची तपासणी करण्यासाठी संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर

यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/१/२०१७ च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गट (समिती) स्थापन करण्यात आली आहे.

(२) राज्यातील सहकारी सूतगिरण्या सुरळीत चालाव्यात तसेच आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात याकरिता प्रतीचाती रुपये ३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्थेकडून/रा.स.वि.नि. कडून त्यांचेस्तरावर कर्ज घेतल्यास त्यावरील ५ वर्षाचे कमाल १२% पर्यंतचे व्याज शासन भरेल याबाबतचा शासन निर्णय दिनांक ११/१/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच वीज दरात सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळ उपसमितीसमोर सादर करण्याबाबत निदेश असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील श्री.महालक्ष्मी मंदिराच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत**

**(४५) २६६०३ (०४-०१-२०१७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वाधिक गर्दीच्या मंदिरापैकी एक असलेल्या कोल्हापूर येथील श्री.महालक्ष्मी मंदिराच्या सुरक्षेसाठी शासनाकडे आर्थिक तरतुद नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धार्मिक स्थळे आणि मंदिरावर होत असलेले दहशतवादी हल्ले पाहता श्री.महालक्ष्मी मंदिराच्या सुरक्षेकडे होणारे दुर्लक्ष भाविकांच्या व मंदिराच्या प्राचीन शिल्पकौशल्य, स्थापत्यकला यांच्या सुरक्षेसाठी येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०२-२०१७) :** (१) व (२) श्री.महालक्ष्मी मंदिराच्या आवारात जुनाराजवाडा पोलीस ठाणे असून मंदिराच्या सुरक्षेकरीता मनुष्यबळात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील करुळ व**
**भुईबावडा घाटातील मार्गाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४६) २६६०४ (३०-१२-२०१६) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गगनबावडा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तळकोकणाकडे जाणाऱ्या करुळ व भुईबावडा घाटात दरड कोसळल्यामुळे सदर मार्ग असुरक्षित व दुरवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाट मार्गाच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे रूपये १० कोटीचा प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावाला मंजूरी देऊन सदर घाटाचे फेर सर्वेक्षण करुन नियोजनबध्द पुर्नबांधणीसाठी आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) नाही.

घाटामार्गात अतिवृष्टीच्यावेळी काही ठिकाणी दरडी कोसळल्यामुळे घाट काही कालावधीसाठी वाहतुकीस बंद होतो. या दरडी दुर करुन वाहतूक सुरळीत सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(२), (३) व (४) दरडी कोसळल्यामुळे नादुरुस्त झालेल्या संरक्षक भिंतीची दुरुस्ती करण्यात आली आहे. क्षतिग्रस्त झालेल्या डांबरी पृष्ठभागाची दुरुस्ती करण्याचे काम निविदा स्तरावर आहे.

प्रश्नांकित रस्त्यापैकी तरळा जंक्शन ते कोल्हापूर या लांबीतील रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून केंद्र शासनाने घोषित केला आहे. या लांबीतील रस्त्यांची सुधारणा/दुरुस्ती देखभालीचे काम केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे. रस्त्याच्या उर्वरित लांबीतील काही दुरुस्ती / सुधारणा करण्याची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**ठिंबक सिंचनाला प्रोत्साहन देण्याबाबत**

**(४७) २६६१० (२४-०१-२०१७) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८-१९ च्या हंगामापासून ठिंबक सिंचनावर तयार झालेला ऊस गाळप करण्याचे बंधन साखर कारखानदारांवर घालणार असल्याचे शासनाने जाहिर केले असल्याचे माहे सप्टेबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टप्याटप्याने सन २०१९ पर्यंत सर्व साखर कारखाने ठिंबक सिंचनाखाली आणण्याचे शासनाने जाहिर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठिबंक सिंचन करण्यासाठी शेतक-यांकडे आर्थिक पाठबळ असणे आवश्यक असून जमिनीच्या उपविभाजनामुळे धारण क्षेत्राचे आकारमान घटल्यामुळे १०/१५ गुंठे क्षेत्रावर ठिबक सिंचन करणे शक्य नाही, हे खरे आहे काय
(४) असल्यास, त्यासाठी सहकारी पाणी संस्थानाच अर्थसहाय्य देवून ठिबंक सिंचनाला प्रोत्साहन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०३-२०१७) :** (१) नाही.
(२), (३) व (४) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने दिनांक ६/१०/२०१६ च्या शासन निर्णयान्वये ऊस ठिबक सिंचन योजनेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे.

---

**विक्रमगड (जि.ठाणे) येथे प्रशासकीय भवन उभारण्याबाबत**

**(४८) २७३३७ (२४-०४-२०१२) श्री.जयंत पाटील, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.ठाणे) येथे प्रशासकीय भवनासाठी शासनाची मंजूरी मिळाली असून केवळ इमारत बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे मंजूर झालेला निधी परत जात असल्याचे माहे जुलै, २०११ मध्ये ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रशासकीय भवनाची इमारत बांधण्याकरिता शासनाने जागेची उपलब्धता करुन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, जागेची उपलब्धता नसताना प्रस्तावास मान्यता देण्याचे प्रयोजन काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि.ठाणे यांनी प्रशासकिय भवनाच्या बांधकामाकरिता जागा उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, जि.ठाणे यांना कळविले आहे. तसेच अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार, विक्रमगड यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे.
(३) दिनांक १२/०६/२००७ रोजी अंदाज समिती समोर झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी नवनिर्मित तालुक्यांच्या ठिकाणी तहसिल कार्यालयासाठी प्रशासकीय इमारत बांधण्याच्या मुद्यावर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने, ठाणे जिल्ह्यातील नवनिर्मित विक्रमगड तालुका प्रशासकीय इमारतीचे बांधकामाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्राप्त झाले. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

---

### पुणे शहराचा वाहतूक विकास आराखडा करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४९) २८०१७ (०८-०५-२०१२) डॉ.निलम गाऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २२४६१ ला दिनांक १४ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाने सन २००७ मध्ये पुणे शहराचा वाहतूक विकास आराखडा करण्यासाठी निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महापालिकेने वाहतूक विकास आराखडा तयार करुन अद्यापी केंद्र शासनाकडे पाठविलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची कारणे काय आहेत व सदर आराखडा केंद्र शासनाकडे केव्हा पाठविण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१७) :** (१) पुणे शहराची वाहतुक विकास आराखडा करण्यासाठी निवड केली हे खरे नाही. तथापि, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुररुस्थान अभियान अंतर्गत शहर विकास आराखडा मान्य करताना केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार पुणे शहर व परिसरातील वाहतुक सुरळीत होणेच्या दृष्टीकोनातून "राष्ट्रीय शहर वाहतुक धोरणास अनुसरुन" सर्व समावेशक वाहतुक आराखडा (कॉम्प्रेहेन्सीव्ह मोबिलीटी प्लॅन) तयार करणेत आलेला आहे. सदर सर्वसमावेशक आराखड्यास पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभा ठराव क्रमांक ८१ दिनांक १८/०५/२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(२) नाही.

पुणे महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या शहर विकास विभागाकडे दिनांक १३/८/२००८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये सर्व समावेशक वाहतुक आराखडा (कॉम्प्रेहेन्सीव्ह मोबिलीटी प्लॅन) सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने पाठविलेले १४ प्रस्ताव अद्याप मंजुर न झाल्याबाबत

**(५०) ४२०१६ (३०-०८-२०१३) श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिकेने शासनाकडे १४ प्रस्ताव मंजूरी करीता पाठवून मंजूरी प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावापैकी २ प्रस्ताव कार्यालयात विचाराधीन असून ३ प्रस्ताव मा.प्रधान सचिवांकडे विचाराधीन आहेत व ९ प्रस्ताव नगरविकास विभागातील कक्ष अधिकाऱ्यांकडे विचाराधीन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव तात्काळ निकाली काढावे याकरिता नागपूर महानगरपालिकेच्या मा.महापौरांनी व नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक २० ते २२ मे, २०१३ रोजीच्या वा त्यासुमारास शासनास पत्र पाठवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विकासाच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या ह्या सर्व प्रस्तावांबाबत मंजुरीचा निश्चित कालावधी ठरविण्यात आलेला आहे काय, त्याचप्रमाणे कालावधीची मर्यादा किती आहे,
(५) नसल्यास, मंजुर न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) नागपूर महानगरपालिकेने शासनाकडे पाठविलेल्या १४ प्रस्तावापैकी १२ प्रस्ताव मंजूर झाले आहेत. उर्वरीत दोन्हीही प्रस्तावाबाबत महानगरपालिका नागपूर यांचे स्तरावर सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे. अद्याप महानगरपालिकेकडून सुधारित फेरबदल प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झालेले नाहीत.
(३) होय.
(४) वरीलप्रमाणे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.